# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६२ वी बैठक दिनांक २४ नोव्हेंबर २००९

### ठराव

मा. ना. रामराजे नाईक-निंबाळकर, मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ६२ वी बैठक दि. २४ नोव्हेंबर २००९ रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य, सदस्यांचे प्रतिनिधी व निमंत्रित उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना. रामराजे नाईक निंबाळकर | ... | मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष |
| २. | मा. ना. विजय वडेट्टीवार | ... | राज्यमंत्री, जलसंपदा व उपाध्यक्ष |
| ३. | मा. श्री. सुनिल सोनी | ... | प्रधान सचिव (नियोजन) व सदस्य |
| ४. | मा. इं. ए. बा. पाटील | ... | सचिव (जसं) व सदस्य (अ.का.) |
| ५. | मा. इं. ए. बा. पाटील | ... | सचिव (लाक्षेवि) व सदस्य |
| ६. | इं. ह. य. कोळवले | ... | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**नियामक मंडळाच्या सदस्यांचे प्रतिनिधी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती. एम. व्ही. कोकणे, सहसचिव | ... | प्रधान सचिव (वित्त) व सदस्य यांचे प्रतिनिधी |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इं. सु. ल. पाटील | ... | मुख्य अभियंता (जसं), पुणे |
| २. | इं. शि. मा. उपासे | ... | मुख्य अभियंता (विप्र), पुणे |
| ३. | इं. ज. म. जाधव | ... | मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग, नाशिक |
| ४. | श्री. अनिल शिरुडे | ... | मुख्य लेखा व वित्त अधिकारी (मकृखोविम) |

सदर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

**"मान्य"**

(इंजि. ह. य. कोळवले)
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६२ वी बैठक दिनांक २४ नोव्हेंबर २००९

ठराव क्र. ६२/१

"ठराव करण्यांत येतो की, नियामक मंडळाच्या ६१ व्या बैठकीत पारित झालेले ठराव कायम करण्यात येत आहेत."

---

ठराव क्र. ६२/२

"ठराव करण्यांत येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत मोठ्या/मध्यम प्रकल्पांना व उपसा सिंचन योजनांना केंद्रीय जल आयोग/पर्यावरण/नियोजन आयोगाची मान्यता घेणे व अेआयबीपी अंतर्गत प्रकल्पांना अर्थसहाय्य मिळण्यासाठी पाठपुरावा करण्यासाठी महामंडळास सहाय्यक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या श्री. के. व्ही. भट,निवृत्त संचालक, केंद्रीय जल आयोग, नवी दिल्ली यांना प्रवास भत्त्यापोटी रु.३०००/- प्रतिमाह खर्च करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे."

---

ठराव क्र. ६२/३

"ठराव करण्यात येते की, मौजे.भादे, ता.खंडाळा, जि.सातारा येथील वीर जलाशयासाठी संपादित केलेली १२००० चौ.मी. (१.२० हे.) जागा वीर जलाशयात उदंचन विहीर (जॅकवेल), पोहोच चॅनेल खोदणे, वॉकवे बांधकाम, जलवाहिनी टाकणे इत्यादी प्रयोजनार्थ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास प्रचलित शासकीय दरानुसार येणा-या भाडेपट्टयाने वापरण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

---

ठराव क्र. ६२/४

"महामंडळाच्या कार्यक्षेत्रात सध्या असलेले वीज निर्मिती प्रकल्प व नियोजित वीज निर्मिती प्रकल्पांना लागणारे पाणी व पाण्याचे स्त्रोत" हा विषय नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्याने याबाबत कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही.

---

ठराव क्र. ६२/५

"महामंडळांतर्गत निधीतून यांत्रिकी विभागामार्फत नव्याने खरेदी केलेली मशिनरी व सदर मशिनरीमार्फत चालू असलेल्या कामांचा आढावा घेणेबाबत" हा विषय नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्याने कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही. "

---

"मान्य"

(इंजि. ह. य. कोळवले)
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६२ वी बैठक दिनांक २४ नोव्हेंबर २००९

ठराव क्र. ६२/६

"ठराव करण्यांत येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने दिनांक ५.७.१९९ नंतर नियामक मंडळाने पारीत केलेल्या ठराव क्र. १७/६ अन्वये प्राप्त अधिकारान्वये विविध प्रकल्पास प्रशासकीय मान्यता / सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने कार्यकारी संचालक यांनी केलेली असल्याने सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावास नियामक मंडळाची पुन्हा कार्योत्तर मंजूरी घेण्याची आवश्यकता नाही, असे शासनास अवगत करण्यात यावे. मात्र महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने महामंडळ स्तरावर सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान केलेल्या प्रकल्पांची माहिती (प्रशासकीय मान्यता प्राप्त किंमतीच्या तुलनेत झालेली वाढ व कारणमिमांसा) नियामक मंडळाच्या पुढील बैठकीत अवलोकनार्थ सादर करावी."

---

ठराव क्र. ६२/७

ठराव करण्यात येतो की, जलसंपदा विभागांतर्गत सर्व कार्यालयांच्या कार्यप्रणालीमध्ये एकवाक्यता राहाण्याच्या दृष्टीने ई-टेंडर पद्धतीचा अंगीकार करणेबाबत शासनस्तरावर आदेश निर्गमित करण्यासाठी शासनास कळवावे.

---

ठराव क्र. ६२/८

"ठराव करण्यात येतो की, सन २००८-०९ या वर्षाचा प्रकल्प विकास लेखापत्रक व दिनांक ३१/०३/२००९ अखेरचा ताळेबंद याद्वारे स्वीकृत करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

---

ठराव क्र. ६२/९

"ठराव करण्यात येतो की, रुपये ५० लक्ष पेक्षा कमी रकमेच्या लवाद निवाडयांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार पूर्वीप्रमाणेच (नियामक मंडळ ठराव क्र.४९/५ नुसार) महामंडळाच्या कार्यकारी समितीस मा.मंत्री जलसंपदा (कृखोपाम) तथा अध्यक्ष, मकृखोविम यांच्या मंजुरीच्या अधीन राहून देण्यात आलेले आहेत जे शासन परिपत्रक दि.१८/८/२००९ अन्वये अधिक्रमित करण्यात आले आहेत ते पुनर्स्थापित करणेबाबत शासनास कळविण्यात यावे."

तदनंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**"मान्य"**

(इंजि. ह. य. कोळवले)
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे